


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १३७ •रविवार, दि. १७ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध : उपमुख्यमंत्री अजित पवार

**सर्वांच्या सहकार्याने बीड जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करुन चेहरा-मोहरा बदलणार ; १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी बीड-अहिल्यानगर' रेल्वे सुरु होणार**









**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचा कृषी, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, आर्थिक, सांस्कृतिक, उद्योग व क्रीडा आदी क्षेत्रातील सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटिबध्द असून, जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणुन याकरीता सर्वत्तोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्यातील नागरिकांना शुभेच्छा देत म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांना, क्रांतीकारकांना, हौतात्म्य पत्करलेल्या शहिद वीरांना, अभिवादन केले आहे.

असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य, देशाची एकता, अखंडता, सार्वभौमता अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी वचनबद्ध होऊया, सामाजिक जाणीव, राष्ट्रीय कर्तव्य-जबाबदारीच्या भावनेतून राष्ट्रविकासात योगदान देऊया. स्वातंत्र्यदिन हा आपल्यासाठी सर्वात मोठा राष्ट्रीय उत्सव आहे. हा उत्सव तितक्याच उत्साहात, आनंदात, व्यापक स्वरुपात साजरा करायचा आहे. यंदाच्या स्वातंत्र्यदिनी आपण दृढसंकल्प करुया की, राष्ट्रविकासात सर्वांना सोबत घेऊन जाताना शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक यांना प्रगतीची योग्य संधी उपलब्ध करून द्यायची आहे. त्यांचे आर्थिक-सामाजिक सक्षमीकरण करायचे आहे. देशाचे स्वातंत्र्य, एकता, अखंडता, सार्वभौमता, लोकशाही मूल्ये अबाधित राखणे, भारतीय राज्यघटनेवरचा विश्वास अधिक दृढ करणे, ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. ती पार पाडण्यासाठी भारतमातेच्या अनेक सुपुत्रांनी आजवर सर्वोच्च त्याग केला, अमूल्य योगदान दिले. त्या सर्वांबद्दल आपण कायम कृतज्ञ असले पाहिजे. देशाचे स्वातंत्र्य,

▶▶ उर्वरित पान २ वर

## शेतकरीपुत्र खा.सोनवणे भरपावसात शेतकऱ्यांच्या बांधावर; नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिला धीर

**केज तालुक्यात मांजरा नदीच्या पाण्याने ओलांडले पात्र, शेती, पिकांसह घरांचेही अतोनात नुकसान**

**बीड । प्रतिनिधी**

सलग दोन दिवस धो-धो पाऊस...केज तालुक्यात मांजरा नदीतील पाण्याने पात्र सोडले. संपूर्ण मांजराकाठ आणि जवळपास सात गावातील नदीपात्रा शेजारील शेतात पाणी शिरले... उभे पिक वाहून गेलेच पण शेतीही खरडून गेली... डोळ्यादेखत होत्याचे नव्हते झाले. अनेकांच्या राहत्या



घराचीही पडझड झाली. यावेळी ज्यांच्या त्यांच्या डोळ्यात पाणी उतरले. दुपारी १२ वाजता खा.सोनवणे यांना यानगावांमधून फोन आले. यानंतर सोनवणे यांनी नियोजीत दौरा रद्द करून तातडीने क्षतीग्रस्त गावे गाठली. यावेळी पाऊस सुरूच होता. पडत्या पावसात खा.सोनवणे शेतात पोहचले. नुकसानीची पाहणी केली

▶▶ उर्वरित पान २ वर

## संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटलांचा मराठा आरक्षण लढा यशस्वी होणार

**२९ ऑगस्ट चलो मुंबई मराठा आरक्षण लढ्यात सहभागी व्हावे : राजेंद्र मस्के**

**बीड । प्रतिनिधी**

सूर्याचीवाडी ता.बीड येथे सालाबादाप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते. श्री क्षेत्र बेलेश्वरचे हभप तुकाराम महाराज भारती यांच्या कीर्तनाने सांगता झाली. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र म



स्के उपस्थित होते. पंचक्रोशीतील बहुसंख्येने समाज सहभागी झाला होता.यावेळी उपस्थितांना संबोधित करताना राजेंद्र मस्के म्हणाले की,राज्यातील गोर गरीब मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी गेली दोन वर्षापासून संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे

▶▶ उर्वरित पान २ वर

## ना.अजितदादांकडून बीड शहरातील रस्ते, नाल्यांसाठी तब्बल 100 कोटींचा निधी

**आ.संदीप क्षीरसागरांनी मानले ना.अजितदादांचे आभार**




**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील रस्ते आणि नाल्यांची सुधारणा करण्यासाठी ना.अजितदादा पवार यांनी शुक्रवारी (दि.१५) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत तब्बल १०० कोटी रूपयांचा निधी देणार असल्याचे सांगितले. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजित दादांचे आभार मानले आहेत. बीड शहरातील रस्ते आणि नाल्यांचा प्रश्न हा नागरिकांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा झालेला आहे. शहरातील सर्व रस्त्यांची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## काळे झेंडे दडपले... पण शाळांचा प्रश्न दडपणार कसा??

**शाळा ढासळल्या, छप्पर कोसळलं, शासन प्रशासनाला कधी जाग येणार ? : डॉ.गणेश ढवळे**



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या तब्बल ९४ शाळांना इमारतच नाही आणि ३८१ शाळांमधील ६०७ वर्गखोल्या मोडकळीस आल्या आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर

## होमगाड्‌र्स विषयीचा प्रश्न हिवाळी अधिवेशनात मांडावा

**आ.नमिताताई मुंदडा यांना होमगाड्‌र्सचे साकडे**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

होमगाड्‌र्सची ड्युटी ही स्थायी नसल्याने त्यांना वर्षातून जेमतेम ५० दिवसांचा ही रोजगार मिळत नाही. त्यामुळे होमगाड्‌र्सची रोजगारासंबंधी परिस्थिती ही अतिशय गंभीर बनली आहे. त्यामुळे यापुर्वीही २०१९ साली मुख्यमंत्री असताना देवेंद्रजी फडणवीस यांनी १८० दिवस होम गाड्‌र्सना रोजगार मिळण्यासंदर्भात घेतलेल्या निर्णयाची तात्काळ अंम



लबजावणी करावी व याप्रकरणी केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.नमिता अक्षय मुंदडा यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर




# बीडमध्ये जोरदार पावसाचा तडाखा

**मांजरा प्रकल्प तब्बल ८० % भरला, धाराशिव लातूरसह बिदर प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मांजरा प्रकल्पात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. प्रकल्प तब्बल ८० टक्क्यांपर्यंत भरला असून, पुढील दोन दिवसांत आणखी पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे धरणाचे दरवाजे उघडण्याची वेळ येऊ शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे बीड, लातूर, धाराशिव आणि कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाटबंधारे विभागाने याबाबतचे पत्र संबंधित

▶▶ उर्वरित पान २ वर



### पावसा मुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

बीडच्या माजलगाव तालुक्यातील कोथाळा, साळेगाव,मोगरा, गावासह परिसरातील तब्बल पंधरा गावात अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाला आहे. मध्यरात्री झालेल्या पावसाने शेताला तळ्याचे स्वरुप आले आहे. परिसरातील शेकडो एकरवरील पिके पाण्याखाली गेले आहेत. तर अनेक नद्या ओसंडून वाहत आहेत. नदीच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने माजलगाव तालुक्यातील चार गावांचा संपर्क तुटला आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

## शेख बाबु मुनीर यांचा अपघातात मृत्यु

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील मुळचे रहिवाशी आसलेले परंतु नौकरी निमित्त हल्ली बीड येथे कायम वास्तव्यास आसलेले शेख बाबु मुनीर यांचा ऐका क्रेणने तेलगाव नाका रोडवर जोराची धडक दिल्याने दिनांक १६/८/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता जागीच मृत्यु झाला. ▶ उर्वरित पान २ वर



◆ पान १ वरून पुढे...

## बीड जिल्ह्याच्या...

सार्वभौमत्व, लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी आपण सर्वांनी एकजूट होऊन देशाला समृद्ध, बलशाली देश बनवण्याचा निर्धार करुया.

मराठवाड्याची भूमी ही संतांची, शूर-वीरांची, बुद्धीवंत, कर्तृत्ववानाची भूमी आहे. मराठवाड्याला सहजासहजी काही मिळालं नाही, जे काही मिळालं ते संघर्ष करुनंच मिळाले आहे. देशाला १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले, परंतू मराठवाड्याला १७ सप्टेंबर, १९४८ रोजी स्वातंत्र्य मिळाले. त्यासाठी सर्वसामान्य जनतेला, निजामाच्या सैन्याशी लढावे लागले. त्या त्यागाचं स्मरण करुन, त्यांना अभिवादन करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे स्वामी रामानंद तीर्थ यांनी नेतृत्वं केले होते. तसेच दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे यांच्यासारख्या नेत्यांनी त्यांना भक्कम साथ दिली होती. मराठवाडा मुक्तीसंग्रामात प्रत्येक गावातल्या लोकांनी सहभाग घेतला होता, हे या लढ्याचं वैशिष्ट्य होते. आपल्या बीडच्या विठ्ठलराव काटकरांनी निजामाच्या रोहिल्यांना जेरीस आणण्याचं काम केलं होतं.त्यांच्यासोबत काशिनाथ जाधव आणि हिरालाल कोटेचा हे भूमीपूत्र सुध्दा लढ्यात अग्रभागी होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, आजच्या या स्वातंत्र्य दिनी बीड जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून मी, आपणांस विश्वास देतो की, आपल्या सर्वांच्या सहकार्यानं बीड जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करुन चेहरा-मोहरा बदलायाचा आहे. बीड जिल्ह्यासाठी आपण अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर बीड विमानतळ विकास प्रकल्प हाती घेण्यात आला असून, त्यासाठी जागा निश्चिती आणि पूर्वव्यवहार्यता चाचणीसाठी लागणारा निधी जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच येणाऱ्या १७ सप्टेंबर म्हणजे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून आपल्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'बीड-अहिल्यानगर' रेल्वे सुरु करण्यात येणार असल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले. जिल्ह्यातील युवकांना तंत्रज्ञानाधारित कौशल्य मिळण्यासाठी टाटा टेक्नॉलॉजी आणि एमआयडीसी यांच्या सहकार्याने सुमारे १९६.९८ कोटी रुपयांचा 'सीट्रीपलआयटी' हा प्रकल्प उभारण्यात येणार असून नुकतचे याचे भूमि पुजन झाले आहे. परळी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला सुधारित ३५१ कोटींची मान्यता देण्यात आली आहे. त्याच प्रमाणे बीडमधील श्री कंकालेश्वर मंदिर परिसराचा विकास करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यात महसूल भवनाच्या भूमिपूजनाचा शुभारंभ नुकताच पार पडला आहे. मागील आठवड्यात मी जिल्हा दौऱ्यावर असतांना प्रत्येक विभागातील विकासकामांचा आढावा घेतला आहे..

## शेतकरीपुत्र खा.सोनवणे...

. शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू, असा शब्दही शेतकऱ्यांना दिला. बीड जिल्ह्यात काही दिवसांपासून पाऊस हजेरी लावत आहे. दि.१५ ऑगस्ट रोजी पहाटे बीड तालुक्यातील पाली, नाळवंडी, चौसाळा, नेकनूर, लिंबागणेश, पाटोदा तालुक्यात पाटोदा, थेरला, गेवराई तालुक्यात धोंडराई, रेवकी, तलवाडा, केज तालुक्यात संपूर्ण मांजराकाठ व युसूफवडगाव, बनसारोळा, नांदूरघाट, परळी तालुक्यात नागापूर, सिरसाळा, शिरूर तालुक्यातील तिंतरवणी, ब्रम्हनाथ येळंब या महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली आहे. याच बरोबर दि.१६ ऑगस्टच्या पहाटे ही पावसाने हजेरी लावली असून इतर अनेक ठिकाणी सुद्धा पिके पाण्यात आहेत. तर काही ठिकाणी नदीचे पात्र ओलांडून पाणी शेतात शिरले आहेत. केज तालुक्यातील मांजरा नदी दुथडी भरून पाहत असून राजेगाव, दैठणा, बोरगाव, भोपला, हदगाव, डोका व लाखा या सात गावासह संपूर्ण मांजरा पट्ट्यातील गावे क्षतीग्रस्त झालेली आहेत. उभ्या पिकांचे नुकसान झाले आहेच पण जमीनीही खरडून गेल्या आहेत. अनेक वस्त्यांमधे पाणी आले असून घरांची पडझड झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी खा.बजरंग सोनवणे यांना दिली. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे यांनी दिवसभरातील विविध कार्यक्रमांचे दौरे रद्द करत तातडीने क्षतीग्रस्त गावात जावून भेट देण्याचा निर्णय घेतला. राजेगाव येथे ते पोहचले तेव्हा पाऊस सुरूच होता. पडत्या पावसात खा.सोनवणे हे शेतातील पाण्यात उतरले. यावेळी पाण्यातील पिकांची काय अवस्था झाली आहे, हे स्वत: पाहिले. संबंधित शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांच्या डोळ्यात आलेले अश्रू पुसण्याचेही काम खा.सोनवणे यांनी केले. पुढे, दैठणा, बोरगाव, भोपला, लाखा या गावातील नदीपात्राशेजारील शेतात जिथे पाणी शिरले आहे, अशा ठिकाणी पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी धीर तर दिलाच पण तुमच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी राज्य सरकार व जिल्हा प्रशासनाला बोलत आहे. संकटाच्या काळात शासनाने तत्काळ हस्तक्षेप करून शेतकरी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली. मदत मिळवून देण्यासाठी आपल्याला शासन स्तरावर जे जे करावे लागेल, ते आपण करू, असा शब्दही त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

## संघर्षयोद्धा मनोज...

सरकारशी संघर्ष करत आहेत. परंतु सरकार सकारात्मक विचार न करता वेळकाढूपणा करत आहे. प्रत्येक वेळी शिष्टमंडळ पाठवून जरांगे पाटलांच्या उपोषणाला खोटी आश्वासन देवून दिशाभूल केली जाते. न्याय हक्कासाठी एक पाऊल मागे घेऊन परत मनोज दादांच्या नेतृत्वाखाली मोठी झेप घ्यायची आहे. मराठा समाजाला सरसकट ओबीसी मधून आरक्षण मिळावे याकरिता २९ ऑगस्ट रोजी मुंबईत आंदोलन होत आहे. जरांगे पाटलांच्या आंदोलना मुळे लाखो कुणबी प्रमाणपत्र मिळाले. या प्रमाणपत्राचा फायदा मराठा समाजातील मुला-मुलींना शिक्षण व नोकऱ्यांमध्ये होताना दिसतो आहे. स्पर्धेच्या युगात मराठा समाजाचे मुलं मुली शासकीय सेवेत नोकरीला लागत आहेत. मराठा समाजाला प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी लढा चालू आहे. शेतकरी शेतमजूर सर्वांनी आपली कामे बाजूला ठेवून मुला मुलींच्या भवितव्यासाठी २९ ऑगस्ट रोजी जरांगे पाटलांच्या नेतृत्वात होत असलेल्या आंदोलनात मराठा समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

## ना.अजितदादांकडून...

शहरातील रस्ते आणि नाल्यांच्या बाबतीत आ.संदीप क्षीरसागर सातत्याने शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. त्यातच शुक्रवारी (दि.१५) रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार स्वातंत्र्यदिन ध्वजारोहण कार्यक्रमास आले असता जिल्हाधिकारी कार्यालयात एक बैठक पार पडली. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील रस्त्यांच्या बाबतीत चर्चा करून शहरात रस्ते व नाली होण्यासाठी निधीची गरज असल्याचे सांगितले. त्याची ना.अजित दादांनी तात्काळ दखल घेत तातडीने १०० कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात येणार असल्याचे सांगितले. रस्ते आणि नाल्यांच्या दुरावस्थेमुळे होणाऱ्या त्रासातून बीडकरांची सुटका करण्यासाठी आणि बीडला विकासाकडे घेऊन जाण्याच्या मार्गावर आणखी एक पाऊल उचलल्यामुळे मी ना.अजित दादा पवार साहेबांचे मन:पूर्वक आभार मानत असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

## काळे झेंडे...

शिक्षक व विद्यार्थी जीव मुठीत धरून शिक्षण घेत असताना काही शाळांमध्ये छत कोसळून विद्यार्थी जखमी होण्याच्या घटना घडल्या आहेत. दोन वर्षांपूर्वी शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाखांचा प्रस्ताव सादर केला तरी निधी मंजूर झाला नाही. मोडकळीस आलेल्या सरकारी शाळा ढासळल्या,छप्पर कोसळलं, शासन प्रशासनाला कधी जाग येणार? काळे झेंडे दडपले पण शाळांचा प्रश्न दडपणार कसा? असा संतप्त सवाल डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी वारंवार निवेदने व आंदोलन करूनही ठोस निर्णय न झाल्याने अखेर १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री अजित पवारांना काळे झेंडे दाखवण्याचा इशारा दिला. यानंतरच पोलिस प्रशासनाने डॉ. ढवळे यांना नोटीस बजावत लिंबागणेश पोलीस चौकीत स्थानबद्ध केले.

लोकशाही हक्क दडपण्याचा प्रयत्न - डॉ. गणेश ढवळे

स्वातंत्र्यदिनी लोकांच्या प्रश्नांसाठी सनदशीर मार्गाने आंदोलन करणे हा नागरिकांचा हक्क आहे. आंदोलने दडपण्याचा आणि आंदोलनकर्त्यांना पोलीस स्टेशनमध्ये थांबवण्याचा प्रयत्न हा निषेधार्ह आहे. जर पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवणे अपमानास्पद वाटत असेल, तर त्यांनी तातडीने शाळांसाठी निधी द्यावा, अशी भूमिका डॉ. ढवळे यांनी स्पष्ट केली.

## होमगार्ड्स विषयीचा...

पाठपुरावा करून होमगार्ड्स विषयीचा हा प्रश्न आगामी हिवाळी अधिवेशनात मांडावा आणि आम्हाला न्याय मिळवून द्यावा अशी विनंती व मागणी करून होमगार्ड्स बांधवांनी शुक्रवारी भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आ.नमिताताई मुंदडा यांना दिलेल्या निवेदनातून साकडे घातले आहे. होमगार्ड्स बांधवांनी शुक्रवार, दिनांक १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आ.नमिताताई मुंदडा यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्रात सध्या जवळपास ३९२०८ इतके होमगार्ड्स बांधव कार्यरत आहेत. सदर होमगार्ड्सना फक्त सणासुदीच्या काळात, निवडणुका तसेच क्वचित इतर वेळेस कामास लावले जाते व त्यांना फक्त त्याच दिवसाचा रोजगार दिला जातो. अशा प्रकारे त्यांना वर्षातून जेमतेम ५० दिवसांचाही रोजगार मिळत नाही. सदर होमगार्ड्सना रोजगाराची कुठलीही हमी नसते त्यामुळे होमगार्ड्सना इतर दुसरा कुठला तरी रोजगार शोधावा लागतो. आपल्या महाराष्ट्रात विविध शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्था मध्ये कंत्राटी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही किमान ११ महिन्यांचा रोजगार दिला जातो. परंतु, होमगार्ड्सना मात्र वर्षातून जेमतेम ५० दिवसांचा रोजगार मिळणे ही अवघड आहे. तसेच सदर होमगार्ड्सनां उपजिविका भागविण्यासाठी इतर कुठला तरी व्यवसाय करीत असताना ड्युटीवर हजर राहण्याबाबत सांगितले तर ते करीत असलेला सदर व्यवसाय / रोजगार सोडून तात्काळ ड्युटीवर हजर राहावे लागते. परंतु, होमगार्ड्सची ड्युटी ही स्थायी नाही. यापूर्वी युती सरकार असताना ना.देवेंद्रजी फडणवीस हे मुख्यमंत्री व गृहमंत्री असतानां सन २०१९ मध्ये होमगार्ड्सना दोन महिन्यांच्या खंडानंतर दोन महिने काम असे जवळपास १८० दिवस रोजगार मिळावा यासाठी अतिशय चांगला निर्णय घेतलेला होता. परंतु, होमगार्डसच्या प्रश्नानंतर बाबत ना.फडणवीस यांनी दिनांक २१ जुलै २०२३ रोजी होमगार्ड्सना सहा महिने काम व तीन वर्षांनी केलेली जाणारी नोंद बंद याबाबत घोषणा केलेली आहे. त्या अनुषंगाने ही अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तरी याप्रश्नी आमदार नमिताताईंनी महाराष्ट्रातील होमगार्ड्स यांच्या रोजगारासंबंधी वरील परिस्थितीचे अवलोकन करावे तसेच होमगार्ड्सची परिस्थिती अतिशय गंभीर असून होमगार्डसना सहा महिने काम व तीन वर्षांनी केली जाणारी नोंदणी बंद याबाबत घेतलेल्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबतचा महाराष्ट्रातील होम गार्डस यांचा प्रश्न मार्गी लावावा व याबाबत आपल्या स्तरावरून योग्य तो पाठपुरावा, कार्यवाही व शिफारस करावी येत्या हिवाळी अधिवेशनात सदरील प्रश्न विधानसभेत मांडवा अशी नम्र विनंती या निवेदनातून सर्व होम गार्ड्स बांधवांनी केली आहे. सदरील निवेदनावर अहमद करीम पप्पुवाले, एस.एम.शेख, आर.के.कदम, बी.पी.धायगुडे, पी.एस.माने, यु.टी. जाधव, एम.एस.नागराळे, श्री.यु.लोंढे, एम.व्ही.घनघाव, जि.जे.झिरमिळे, एम.व्ही.पांचाळ, एम.के.शेख, एम.बी.शेख, डि.डी.वैद्य, बी.एच. कदम, एस.डब्ल्यू.घुले, एस.एम.इतापे, डी.व्ही.खोसे, सि.डी.राठोड, डि.जी.वाघमारे, भिका बद्रोद्दीन गवळी, आर.एम. गवळी, आर.एम. इंगळे, एल.जी.लाटे, एस.जी.रोडे, डि.यु.जोगदंड, एम.बी.शेख, आर. के.साळवे, बी.एम.कोल्हापुरे, पि.एम.वाघमारे, एन.बी.शेख, जे.के. सय्यद, एम.एम.शेख आदींसह अनेक होमगार्ड्स बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत. याप्रश्नी होमगार्ड्स बांधवांचा प्रश्न आणि मागणी समजून घेत. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण पाठपुरावा करून प्रयत्नशील राहूत असा सकारात्मक प्रतिसाद आमदार नमिताताई मुंदडा यांनी निवेदन देणाऱ्या सर्व होमगार्ड्स बांधवांना दिला. यावेळी अहमद करीम पप्पुवाले (माजी शहराध्यक्ष, युवा मोर्चा भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक आघाडी) आणि रजिया अहमद पप्पुवाले (मंडळ अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महिला मोर्चा.) यांची उपस्थिती होती.

## शेख बाबु...

शहरातील नगर रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तेलगाव रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसापासून संत गतीने सुरू असल्याने रोजच छोटे-मोठे अपघात या ठिकाणी होत आहेत. एका बाजूने रस्ता सुरू असल्याने गेल्याच महिन्यात ऐका तरुणाला टेम्पो ने धडक दिल्याने तरुणाचा जागीच मृत्यू झाला होता. यामुळे कुटुंब व नातेवाईकांनी गुत्तेदार व इंजिनियरवर रोष व्यक्त केला होता. आज दिनांक १६/८/२०२५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास तेलगाव रोड वरून लुना वरून बार्शी नाकाकडे येत असताना भरधाव क्रेणने शेख बाबू मुनीर लुना क्रमांक चक-२३ इघ - २९९६ रा. अमन कॉलनी वय ६८ वर्ष यांना जोरात धडक दिल्याने बाबू मुनीर यांचा जागीच मृत्यू झाला. गेल्या दोन महिन्यापासून बार्शी नाका ते तेलगाव चौक काम संत गतीने सुरू असून रस्ता वाहतूक एकच बाजूने सुरू असल्यानेच हा अपघात झाल्याचे नातेवाईकांनी सांगितले या अपघाताला संबंधित गुत्तेदार व इंजिनियर जबाबदार असल्याचा देखील आरोप या ठिकाणी उपस्थितांनी केला आहे. अपघात स्थळी मोठी गर्दी जमा झाल्याने वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अपघाताची माहिती पेठ बीड पोलिसांना मिळताच पेठ बीड पोलीस कर्मचारी विलास ठोंबरे, पो. भोले यांनी अपघात स्थळी दाखल होऊन वाहतूक सुरळीत केली. शेख बाबु मुनीर यांच्या दुखांकित घटनेने तलवाडा गाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात असुन त्यांच्या नातेवाईकांकडुन या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी बीड पोलीसांकडे करण्यात आल्याचे समजते.

## बीडमध्ये जोरदार...

जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले असून, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

पूरस्थितीचा इशारा- जर धरणातून पाण्याचा विसर्ग करावा लागला, तर मांजरा नदीच्या पात्रालगतच्या गावांमध्ये पूरस्थिती निर्माण होण्याची भीती आहे. त्यामुळे बीड, लातूर, धाराशिव आणि कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाटबंधारे विभागाने याबाबतचे पत्र संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले असून, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

गावकऱ्यांना सतर्कतेचे आवाहन- नदीकाठच्या गावकऱ्यांनी अनावश्यक धोका न पत्करता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, अशी विनंती करण्यात येत आहे. विशेषतः पूरकाठावरील शेती, जनावरांचे चारण तसेच घरांची सुरक्षितता याकडे ग्रामस्थांनी लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. पाऊस अजूनही कायम- हवामान खात्याने कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे मांजरा प्रकल्पातील पाण्याची आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा देत सज्ज राहण्याचे आवाहन केले आहे. . गेल्या दोन दिवसापासून सतत पडत असलेल्या पावसामुळे बीड मधील धनेगाव येथे असलेल्या मांजरा प्रकल्पात पाणीसाठा ८० टक्क्याच्या वर पोहोचलाय. मांजरा धरण क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे गेल्या १८ तासातच या प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात २२ टक्के इतकी मोठी वाढ झालीय. १५ ऑगस्ट रोजी दुपारी या धरणात ५७ टक्के असलेला पाणीसाठा १६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता थेट ८० टक्क्यावर पोहोचला आहे. यामुळे आता पुढील दोन वर्षापर्यंत परिसरातील पाणी प्रश्न मिटला आहे. बीड जिल्ह्यात असलेल्या मोठ्या प्रकल्पापैकी मांजरा एक असून याच मांजरा धरणातून बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातील २२ गावांना पाणीपुरवठा केला जातो. तसेच या धरणाचे पाणी शेतीच्या सिंचनासाठी देखील वापरण्यात येते.

◆ पान ४ वरून पुढे...

## पूरसंकटावर, नैसर्गिक...

आपत्कालीन संपर्क क्रमांक - १०७७ / १००० / ९९२ असून अधिकृत माहिती - डऊवचरहरीरीहीीर यावर मिळेल . यनिमित्ताने हवामान विभागाच्या इशाऱ्यांकडे गांभीर्याने लक्ष द्या . नदी , नाले , तलाव यांच्या पातळीतील बदलावर लक्ष ठेवा. पूराच्या वेळी लहान मुले, वृद्ध , महिलांची विशेष काळजी घ्या , असे शेळके यांनी आवाहन केले . तसेच खालीलप्रमाणे सविस्तर माहिती दिली . महाराष्ट्र व भारतातील पूरस्थिती : महाराष्ट्रात कोकण, पश्चिम महाराष्ट्र , विदर्भ व मराठवाड्यातील घाटमाथा परिसर हे पूरप्रवण मानले जातात. सावित्री, वशिष्ठी, शास्त्री, कृष्णा, पंचगंगा, वारणा, वैनगंगा, पेंच , वर्धा या नद्यांना पावसाळ्यात पूर येतो . तथापि अलीकडील काळात बदलत्या हवामान परिस्थितीत कोणत्याही नदी नाले पुढे यांना अचानक पूर येऊ शकतो त्यामुळे कोणीही गाफील राहता कामा नये. भारतात आसाम , बिहार , उत्तर प्रदेश , केरळ , ओडिशा या राज्यांत दरवर्षी गंभीर पूरस्थिती निर्माण होते . ब्रह्मपुत्रा , गंगा , महानदी , पेरियार नद्यांच्या काठावरील गावे मोठ्या प्रमाणावर बाधित होतात . पूरकाळात घ्यावयाच्या खबरदारी कशी घ्यावी याबद्दल माहिती देताना श्री शेळके म्हटले की हवामान व प्रशासनाच्या सूचनांचे पालन करा . पाण्याची पातळी वाढल्यास उंच ठिकाणी स्थलांतर करावे . विजेच्या तारा, खांब, उपकरणांपासून दूर राहावे . दूषित पाणी पिणे टाळा ; उकळलेले पाणीच वापरा .पूराच्या पाण्यात जाणे टाळा . प्राण्यांना सुरक्षित ठिकाणी बांधा . बचाव पथकाच्या सूचनांप्रमाणे वागा. पूर ओसरल्यानंतर घरात परतताना स्वच्छता व निर्जंतुकीकरण आवश्यक आहे . दूषित पाणी व सडलेले अन्न टाळा, असे उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांची सूचना आहे . राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ( एस डी एम ए ) हे महाराष्ट्रातील आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख प्राधिकरण असून , आपत्तीपूर्व तयारी, बचावकार्य, पुनर्वसन आणि पुनर्निर्माण या सर्व टप्प्यांवर नियोजन व अंमलबजावणी करते. नैसर्गिक आपत्तींसोबतच मानवनिर्मित आपत्तींच्या व्यवस्थापनासाठीही ही संस्था कार्य करते.

## मौजे वाघोरा...

सोडले. परंतु पंधरा दिवसांत चौकशी नाही झाली तर यापेक्षाही उग्र आंदोलन करण्याचा इशारा वाघोरा येथील ग्रामस्थांनी दिला आसल्याचे महादेव मोरे यांनी सांगितले आहे.

## स्वातंत्र्य दिनी...

अंबाजोगाई शहरालगत असलेल्या रिंग रोड शेजारील मोदी लर्निंग सेंटर कॅम्पस मधील बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यु व्हिजन पब्लिक स्कूलच्या भव्य प्रांगणात शुक्रवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारताच्या ७९ व्या स्वतंत्रता दिवसानिमित्त 'स्वातंत्र्याचा सन्मान करणे, भविष्याला प्रेरणा देणे' ही थीम घेऊन विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका, पालक असे एकूण १५० जणांनी एकत्र येऊन राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेतली. आणि सर्वांत मोठी मानवी साखळीच्या सहाय्याने भारताचा नकाशा साकारण्यात आला. स्वातंत्र्य दिन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, अंबाजोगाईचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर (पापा) मोदी हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक आई सेंटर प्रो चे संचालक सर नागेश जोंधळे, ह.भ.प.डॉ.सय्यद रफिक पारनेरकर महाराज, राष्ट्रपती पदक विजेते सय्यद रेहमान, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, माजी प्राचार्य चंद्रकांत गायकवाड, न्यु व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य एम.प्रशांत कुमार, ज्येष्ठ पत्रकार जगन सरवदे, संपादक रणजित डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना राजकिशोर (पापा) मोदी यांनी सर नागेश जोंधळे यांच्या माध्यमातून शिक्षण व प्रशिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य होत आहे असे नमूद केले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाच्या चौकटीत राहून 'हम सब एक है' चा संदेश आपण सर्वांनी जोपासला पाहिजे असे सांगून अंबाजोगाई हे शहर अठरा पगड जातीधर्माच्या लोकांचे शांतता, सद्भाव, संस्कृती व भारतीयत्व जोपासणारे महाराष्ट्राला दिशा देणारे शहर आहे असे त्यांनी सांगितले. ह.भ.प.डॉ.सय्यद रफिक पारनेरकर महाराज यांनी मार्गदर्शन करताना जगात शांतता, समृद्धी, आनंद, सुसंवाद, सुसंस्कार एकत्र नांदावेत. मनुष्य जातीसह प्राणीमात्र सुखी रहावेत अशी प्रार्थना करून भारतीय स्वातंत्र्य, संविधान, लोकशाही, समता, बंधुता या विषयावर मौलिक विचार व्यक्त केले. तर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या भाषणातून विविध दाखले देत, शेरोशायरीतून देशप्रेमाचे स्फुल्लिंग जागविले. तर राष्ट्रपती पदक विजेते सय्यद रेहमान यांनी युवा पिढीने निर्व्यसनी रहावे, आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करावे, देशासाठी योगदान द्यावे, आई-वडिलांची सेवा करावी असे आवाहन केले. प्रारंभी सर नागेश जोंधळे यांनी भारताच्या ७९ व्या स्वतंत्रता दिवसानिमित्त 'स्वातंत्र्याचा सन्मान करणे, भविष्याला प्रेरणा देणे' ही थीम नेमकी काय आहे याबाबत उपस्थितांशी संवाद साधला. राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी संविधान अभ्यासणे काळाची गरज आहे असे ते म्हणाले. यापूर्वी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आणि हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, अंबाजोगाईचे सचिव राजकिशोर (पापा) मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी व न्यु व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य एम.प्रशांत कुमार यांचे जोंधळे यांनी आभार मानले. सुरूवातीला शंकर सिनगारे यांनी त्यांच्या मधुर आवाजात 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत गाऊन महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाला पाठिंबा दर्शविला. हा ऐतिहासिक स्वातंत्र्य दिन सोहळा यशस्वी करण्यासाठी विश्वविक्रमवीर सर नागेश जोंधळे यांच्या नेतृत्वात कृतिशील मुख्याध्यापिका पुनम माने (जिल्हा परिषद शाळा, वडार वाडा, चनई.) यांनी पुढाकार घेत येथील विद्यार्थ्यांना आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लढणाऱ्या विविध व्यक्तिमत्त्वांचा पेहरावामध्ये इयत्ता पहिलीतील तनुजा परमेश्वर अलकुंटे (कॅप्टन लक्ष्मी सेहगल), इयत्ता दुसरी वर्गातील रोहिणी राहुल गोचडे (नी बेझंट), सिया नागनाथ चौगुले (क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले), निकिता परमेश्वर पेठकर (बेगम हजरत महल), समृद्धी सुहास वरवडे (मॅडम कामा), इयत्ता ५ वी वर्गातील रोहित राहुल गोचडे (क्रांतीसूर्य ज्योतिराव फुले तसेच न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे रिया व आराध्या जोत्सना बालासाहेब कदम या चिमुकल्या बहिणींनी (अनुक्रमे इंडियन व सावित्रीमाई फुले), यश स्वाती नागेश जोंधळे (डॉ.बाबासाहेब आंबेडकर), शिवेंद्र सुनिता रणजित डांगे (लोकनायक जयप्रकाश नारायण), सोनम कांबळे (सरोजिनी नायडू), जुळी भावंडं हुझैफ व उझैर आफरीन अलीम शेख यांनी अनुक्रमे (मौलाना अब्दुल कलाम आझाद व डॉ.राजेंद्र प्रसाद), समर्थ सुषमा श्रीराम साखरे (लाल बहादूर शास्त्री), नयन नम्रता महेश जाधव (पंडीत जवाहरलाल नेहरू) या महापुरूषांच्या आकर्षक वेशभूषेत सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळची थीम 'स्वातंत्र्याचा सन्मान करणे, भविष्याला प्रेरणा देणे' 'तसेच हम सब एक है, भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू होवो' चा नारा देत भारतीय संविधानाची उद्देशिका यांचे सामूहिक वाचन करून ७९ वा स्वातंत्र्य दिन अतिशय उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली न्यु व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य, सर्व शिक्षिका, शिक्षकवृंद, कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच ॲड.अलिम शेख, राजेसाहेब सरदेशमुख (मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा.श्रीपतरायवाडी), संगणक तज्ज्ञ सुनिल वाघमारे, सुमित खोत, सोमनाथ विभुते, धम्मदीप वैद्य, रोहन खंदारे, प्रेस फोटोग्राफर प्रविण चोपने आणि सर्व आई सेंटरच्या फॅमिली मेंबर्सनी परिश्रम घेतले. यापूर्वी ही शहरातील आई सेंटर प्रो चे संचालक सर नागेश जोंधळे यांच्या कल्पक दृष्टीकोनातून अंबाजोगाईकरांनी भारतीय प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध जागतिक विक्रमांना गवसणी घातली आहे हे विशेष होय.

## बाजीराव चव्हाण ...

दिनानिमित्त तीन ठिकाणी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन रुग्णसेवक रोहित धुंरधरे यांनी आरोग्य दूत बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रबावले आहे. या मोफत शिबिरात बीड शहरातील शेकडो गरजू दंत रोग, नेत्ररोग रोग, लहान मुलांच्या तपासण्या, बीड शहरातील तीन नामांकित हॉस्पिटल, नीरा हॉस्पिटल डीपी रोड बीड,येथे मोठया प्रमाणात मोफत करण्यात आल्या. शिबिरामध्ये प्रामुख्याने लहान मुलांच्या तपासण्या येथे नीरा हॉस्पिटलचे सुप्रसिद्ध डॉ, राऊत यांच्यामार्फत महात्मा ज्योतिबा फुले योजने अंतर्गत मोफत करण्यात आल्या. तसेच सिद्धिविनायक सुपर मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल बीडचे सुप्रसिद्ध डॉक्टर मनोज पवार यांच्या मार्फत डोळ्यांच्या तपासण्या महात्मा ज्योतिबा फुले योजने अंतर्गत मोफत करण्यात आल्या. तसेच लोकसेवा डेंटल क्लिनिक बीडचे सुप्रसिद्ध डॉ, किरण वनवे, व डॉ, भक्ती वनवे यांच्या मार्फत दंत रोगाच्या मोफत तपासण्या झाल्या. या मोफत माहाआरोग्य शिबिरात बीड शहरातील आणि ग्रामीण भागातील शेकडो गरजू रुग्णांनी लाभ घेतला. आणि रुग्णांनी बाजीराव दादा चव्हाण यांचे मोफत शिबिर राबवून आरोग्य सेवा दिल्याबद्दल भरभरून आभार मानले. यावेळी मोफत शिबिरामध्ये रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मोफत छत्रीचे वाटप देखील करण्यात आले आहे. यावेळी आरोग्य शिबिरात रुग्णांना सेवा देण्यासाठी उपस्थित आयोजक रुग्ण सेवक रोहित धुरंधरे, वैद्यकीय जिल्हाध्यक्ष महादेव मातकर, शेतकरी राजा समितीचे युवा जिल्हाध्यक्ष यश दुनघव, समाजसेवक अशोक दादा ढोले पाटील, युवा कार्यकर्ता तावरे प्रकाश, रुग्णसेवक सुधाकरराव राकुसले, जालिंदर शिंदे, महेश काळे, आदी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड शहर, तसेच बाजीराव दादा चव्हाण युवा मंच व धर्मवीर प्रतिष्ठानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजे शिवाजी....

विनायक जमदाडे, गणेश निकम, नामदेव चोरघडे,ऋषिकेश कुलकर्णी, भाऊ टोम्पे , डॉ संतोष गायकवाड , गुरुदत्त गिरी ,गोविंद केसापुरे, गणेश शिरसाट ,सदस्य पदी विशाल माने, शिव निर्मल,ओमकार गिरी, रितेश शेटे, रुपेश लांडगे, विशाल केसापुरे,शिवा एखंडे, आशुतोष शर्मा ,श्रीकांत शिंदे ,प्रशांत शेलार, श्री सुचंद्र स्वामी राजेश लांडगे, शुभम यादव, मनोहर काशीद ,सुनील एखंडे ,भारत ढगे,दत्ता शेजुळ,संतोष चोरघडे, सिद्धेश्वर मिटकरी, शिवा एखंडे ,सुनील केसापुरे,प्रशांत स्वामी,अथर्व जोशी , शुभम स्वामी ,सचिन मोहिते, सुरज साडेगावकर, विनोद देशमुख, कृष्णा मलपाणी ,राजेश वैरट, सुमित भांडवलकर ,दत्ता शिरसाठ, सुमित घेणे,शंकर वटाणे, तुषार शिंदे, गोविंद सोळंके, अशोक लोकरे ,दत्तात्रय सेलुकर सर्व सदस्यांची निवड झाली असून सर्व पदाधिकाऱ्यांचे सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या...

## स्वातंत्र्यरक्षणाबरोबरच...

मान्यवरांच्या हस्ते संकुल परिसरात ५०० झाडांच्या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण निर्माण करण्याचा संकल्प स्वातंत्र्य दिनी घेण्यात आला. सरस्वती कन्या प्रशाला, रामराव पाटील मा उच्च माध्यमिक विद्यालय,आदर्श प्राथमिक विद्यालया यांसह विविध शाखेचे ध्वजारोहण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश माने, प्रास्ताविक श्री. नारायण चोले तर आभार प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांची यावेळी उपस्थिती होती.

## कृष्णा अर्बन...

बप्पासाहेब घुगे, केजच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड,जेष्ठ नेते सखाहरी गदळे,दादासाहेब मुंडे,भगवान सेनेचे जिल्हाध्यक्ष मुरलीधर ढाकणे,भाजपाचे तालुकाध्यक्ष भगवान केदार,जेष्ठ नेते रामकृष्ण घुले,दत्ता धस,शरद गदळे,माजी पंचायत समिती सदस्य अशोक चाळक,धैर्यशिल देशमुख,अशोक वाघमारे,उद्धव देशमुख,पिराचिवाडीचे सरपंच विनोदास यादव,एकुरक्याचे सरपंच प्रशांत केदार,पिंपळगावचे सरपंच सचिन गायकवाड,सारुळचे सरपंच बालाजी ढाकणे,शिंदीचे सरपंच सुशिल जाधव,कासारीचे सरपंच सुखदेव वायबसे,जिवाचिवाडीचे सरपंच दिपक काळे,सारणीचे सरपंच राहुल ओव्हळ,येवता गावचे सरपंच विलास जोगदंड,लव्हुरीचे सरपंच पंडीत चाळक,माजी सरपंच महादेव जाधवर,देवगावचे माजी उपसरपंच विठ्ठल मुंडे,माजी सरपंच हनुमंत पाटील, माजी सरपंच गणेश बसवर,माजी सरपंच उमेश आंधळे,माजी सरपंच संजय कुटे,उपसरपंच बापुराव कराड,जनार्दन कदम से.स.सोसायटीचे चेअरमन रघुनाथराव बारगजे,बळीराम चाळक,उद्योजक महादेव चौरे,युवा नेते नवनाथ मोरे,सुरज घुले,डॉ.धनराज पवार,सुहास पवार, डॉ.उदय पवार,राजाभाऊ मुंडे,किशोर देशमुख,बप्पासाहेब पाळवदे,प्रकाश रोमण,अंकुश मोरे, ऋषिकेश जाधव,प्रभाकर वायबसे,आत्माराम भोसले,पांडुरंग भोसले,भोसले,राजेंद्र मोराळे,शिवरामपुरी पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुळे,महारूद्र मुंडे,रामदास गित्ते,चंद्रभान तांबडे,नवनाथराव घुले,प्रा.मुकुंद घुले,दादाराव मोराळे,विजयकुमार कातमांडे,मच्छिंद्र सांगळे,शिवाजी घोडके,महादेव सांगळे यांच्या उपस्थित संपन्न झाली यावेळी बँकेचे चेअरमन विजयकांत (भैय्या) मुंडे,व्हाईस चेअरमन चंद्रकांत कुलकर्णी,सरपंच अतुल (दादा) मुंडे,प्रा.सौ.माधुरीताई मुंडे,सौ.रूपालीताई मुंडे,बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वसुदेवराव मुंडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदिपान डोळे,शिवरामपुरी पतसंस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. सुनिता पवार यांनी मान्यवरांचा यथोचित सन्मान केला.प्रसंगी बँकेचे सर्व संचालक,कर्मचारी,सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.प्रविण कन्हेरे सर यांनी केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# खडकत ग्रामस्थांची पाण्यासाठी एकजूट; आ. सुरेश धस यांच्याकडून ग्रामस्थांच्या कार्याचे कौतुक

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील खडकत येथे दरवर्षी दिवाळीनंतर भेडसावणाऱ्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी दाखविलेली ऐक्यभावना आणि स्वयंस्फूर्तीचे प्रयत्न हे खरोखरच कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी आपल्या भेटी दरम्यान केले. खडकत गाव हे सीना नदी शेजारी असूनही पावसाळ्यानंतर पाणी साठवणुकीची सोय नसल्याने गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी गंभीर समस्येला सामोरे जावे लागते. या प्रश्नाच्या मूळ उपाययोजनेसाठी शासनस्तरावर अंदाजपत्रक तयार झाले असले तरी खर्चाच्या प्रचंड आकारामुळे योजना अद्याप मंजूर होऊ शकली नाही. अशा कठीण परिस्थितीत गावातील सरपंच शांतीलाल काटे, गुलाब जेवे,बंटा जाधव,शिवाजी जेवे,अप्पासाहेब जाधव या ग्रामस्थांनी स्वखर्चाने नदीतील पाणी उचलून साठवण बंधाऱ्यात वळविण्याची तात्पुरती सोय केली .ग्रामस्थांच्या या लोकहितवादी उपक्रमाची शनिवारी आमदार सुरेश धस यांनी पाहणी करत विशेष कौतुक केले.मूळ योजना शासनाकडून मंजूर होण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करत असून यात कुठेही कमी पडणार नाही असा विश्वास आ.सुरेश धस यांनी ग्रामस्थांना दिला. यावेळी योगदान देणाऱ्या ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ह.भ.प. जाधव महाराज, सभापती बद्रीनाथ जगताप, माजी सभापती दत्तात्रय जेवे, विजय भोस्टे, प्रा.तात्यासाहेब जेवे, संजय जेवे, दादासाहेब बळे,भीमराव बळे,विठ्ठल तोरणमल सर यांच्यासह खडकत व बळेवाडी येथील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आ.सुरेश धस यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी

**मतदारसंघाचे लोकप्रिय आ.सुरेश धस आणि गावातील शेतकऱ्यांच्या सहकार्याने गावतुन जात असलेल्या सीना नदीतुन एका पाझर तलावात दोन मोटारी टाकून पाणी उपसा केले. कमी खर्चात हा प्रयोग यशस्वी होत असुज. संपूर्ण गाव या उपक्रमामुळे बागायती होणार आहे.या उपक्रमामुळे खडकत गावचा पाणी टंचाई चा दरवर्षीचा मोठा प्रश्न मार्गी लागला असुन येणाऱ्या काळात असाच आणखी एक प्रयोग आम्ही करणार असून आ.सुरेश धस याची पाहणी करून याबाबत शासन दरबारी पाठपुरवा करून तात्काळ मार्ग काढू असे आश्वासन दिले असून यामुळे अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आमचा मार्गी लागणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.ग्रामस्थांच्य आ. सुरेश धस यांचे आभार मानले जात आहे. – दत्तात्रय जेवे, माजी सभापती , कृषी उत्पन्न बाजार समिती कडा**

# दैव बलवत्तर म्हणून पुलावरून पाण्यात वाहून गेलेले राजाभाऊ टिंगरे सुखरूप: नागरिकांची पुलाची उंची वाढवण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

सात्रा पोथरा , मुर्शदपूर घाट ता. जि . बीड येथे १५ ऑगस्ट, शुक्रवार रोजी सकाळी ७:१५ वाजता एक जीवघेणी घटना घडली . पोथरा गावातील रहिवासी राजाभाऊ रामचंद्र टिंगरे हे काशेश्वरी देवीच्या दर्शनासाठी जात असताना पाण्याच्या जोरात पुलावरून वाहून गेले . काल दुपारी तीन वाजल्यापासून परिसरा त झालेल्या मुसळधार पावसामुळे खडकी व पोथरा – मुर्शदपूर घाट येथील तलाव भरले . परिणामी दोन्ही नद्यांना पुराचे पाणी मोठ्या प्रमाणात आले व पाणी दोन्ही पुलांवरून वाहू लागले . दोन्ही पुलांची उंची कमी



असल्याने पाण्याचा वेग आणि दाब अतिशय जास्त होता . कदाचित याचा अंदाज राजाभाऊ टिंगरे यांना नसल्याने ते पुलाच्या मध्यापर्यंत गेले ; मात्र अचानक पाय घसरून ते पाण्यात वाहून गेले . घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिक नदीकाठी जमले आणि



शोधमोहीम सुरू झाली . जवळपास तीन–चार तासांच्या प्रयत्नांनंतर राजाभाऊ टिंगरे ऊसाच्या शेतातील गाळामध्ये अडकलेले सापडले . ग्रामसेवक संजय सानप यांच्या उपस्थितीत गावकऱ्यांनी त्यांना बाहेर काढून सुखरूप घरी पोहोचवले . सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे .

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना गावकऱ्यांनी तात्काळ या घटनेची माहिती दिल्यानंतर तहसीलदार शेळके यांनी सूत्र फिरवली . मंडळ अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्राम महसूल यांना सूचना देऊन तात्काळ त्या ठिकाणी पाठविले . तसेच संबंधित दुर्घटनाग्रस्त यांच्या तब्येतीची विचारपूस केली , त्यांना दवाखान्यात नेण्याचा सल्ला दिला आणि गावकऱ्यांना दूरध्वनीद्वारे धीर दिला . त्यांच्या या कृतीमुळे गावकऱ्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके , मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे व ग्रामपंचायत अधिकारी संजय सानप यांचे आभार मानले .

# पाटोद्याच्या विकासासाठी नगरसेवक संतोष दादा जाधव यांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची घेतली भेट

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहर व तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी पाटोदा नगरपंचायतचे लोकप्रिय नगरसेवक संतोष दादा जाधव यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेऊन शहरातील अनेक महत्त्वाचे प्रश्न मांडण्यात आले. नगरसेवक संतोष जाधव यांच्या सोबत अंमळनेर जिल्हा परिषद गटाचेनेते बाळासाहेब पवार व पारगाव जिल्हा परिषद गटाचेनेते शामराव हुले उपस्थित होते. तिघांनीही आपल्या भागातील समस्या आणि विकासाचे प्रश्न पालक मंत्र्यांसमोर माडले यावेळी नगरसेवक संतोष दादा जाधव म्हणाले जनतेच्या



समस्या सोडवून पाटोद्याचा चेहरा मोहरा बदलणे हे आमचे ध्येय आहे. आगामी काळात अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पाटोद्याचा विकास जलद गतीने होईल.

# सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी मिरवणूक संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या सप्तशतोकोतर सुवर्ण महोत्सवी.. ७२५ व्या जयंती निमित्त माऊलींची पालखी मिरवणूक आणि वारकरी सांप्रदायिक दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

या शोभायात्रा आणि दिंडीमुळे आष्टी शहर भक्तिमय झाल्याचे दिसून येत होते.या शोभायात्रेत आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस व नगरपंचायत चे मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार बाळ दत्त मोरे यांनी सहभाग झाले होते. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून.. कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर ७२५ व्या सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त राज्यभरातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां,नगरपंचायत, नगरपरिषद, या ठिकाणी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीची मिरवणूक आणि वारकरी संप्रदायाच्या जयघोषात दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात येत आहे.या



पार्श्वभूमीवर आष्टी नगरपंचायत कार्यक्षेत्रामध्ये भाविकांच्या उत्साहात आणि भक्तिभावाने माऊलींचा भव्य पालखी सोहळा आयोजित करण्यात आला. पारंपरिक वेशभूषेत टाळकरी, वारकरी संप्रदायातील मंडळी तसेच नागरिक बंधू–भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ज्ञानोबा माऊली आणि माऊली माऊलीच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला.. यावेळी हरिभक्त परायण अशोक भोसले महाराज यांच्या श्री संत नामदेव महाराज गुरुकुल पारगाव जोगेश्वरी येथील ३५ विद्यार्थ्यांनी या दिंडी सोहळ्यामध्ये सहभाग नोंदवला आष्टी शहरातील श्री दत्त मंदिर येथून या पालखी सोहळ्यातील सुरुवात करण्यात आली आणि ही शोभायात्रा दत्त मंदिर गल्ली कसबा पेठ कुंभार गल्ली जैन मंदिर कमान वेस मार्गे मुख्य बाजारपेठ शनी मंदिर चौक येथून छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये या शोभा यात्रेची सांगता झाली.

या पवित्र सोहळ्यात सहभागी होऊन माऊलींचे दर्शन घेत अनेक भाविक भक्तांनी आत्मिक आनंदाचा अनुभव घेतल्याचे पहायला मिळाले असे प्रतिपादन आ.सुरेश धस यावेळी वारकऱ्यांशी संवाद साधताना केले. या शोभायात्रेत आष्टी नगरपंचायतचे अधिकारी, कर्मचारी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### खा.रजनीताई पाटील यांच्या उपस्थितीत दै लोकनायकचे व्यवस्थापक ॲड अक्षय मुळे ; बसपाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष विशाल साबळे यांच्यासह कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

# काँग्रेस पक्ष सामान्य जनतेसाठी लढणारा पक्ष आहे : खा रजनीताई पाटील



**केज । प्रतिनिधी**

केज शहरात झालेल्या भव्य कार्यक्रमात दै. लोकनायक चे व्यवस्थापक ऍड. अक्षय मुळे तसेच बहुजन समाज पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साबळे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करून तालुक्यातील राजकीय समीकरणांना नवे वळण दिले. हा प्रवेश सोहळा खासदार रजनीताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या राज्यसभा खा .रजनीताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली ,काँग्रेस प्रदेश सरचिटणीस मा आदित्य दादा पाटील,जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे,प्रवीण भाऊ शेप, मा पशुपतीनाथ दांगट,बाळासाहेब ठोंबरे, मुन्ना ठोंबरे, गणेश बुजगुडे, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव आकाश मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत दै. लोकनायकचे व्यवस्थापक ॲड अक्षय मुळे बसपाचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साबळे,संकेत साबळे,रवी साबळे,प्रवीण खाडे, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी केज येथे काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

रजनीताई पाटील म्हणाल्या, काँग्रेस पक्ष हा सामाजिक न्याय, समता आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणारा पक्ष आहे. युवा व सामाजिक कार्यकर्त्यांचा पक्षावर वाढता विश्वास हीच खरी ताकद आहे. काँग्रेस पक्षाचे जनमानसामध्ये विश्वासार्हता आहे सामान्य माणसाच्या हितासाठी लढणारा हा पक्ष आहे.काँग्रेसची विचारधारा ही सामान्यांच्या हिताची आहे. सर्व जाती, धर्म पंथाचा काँग्रेसवर विश्वास आहे.यामुळे पक्षाचा व्यापकता अजून वाढत आहे. येणाऱ्या कालावधीत होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसची ताकद वाढत आहे जनता काँग्रेसच्या सोबत येणार आहे .यापुढील काळात कार्यकर्त्यांना सोबत घेऊन लोकशाहीचा विजय निश्चित होईल असे मत यावेळी खा.रजनीताई पाटील यांनी व्यक्त केले.

काँग्रेसमध्ये दाखल होताना अक्षय मुळे यांनी सांगितले की, दै. लोकनायक या वृत्तपत्राच्या माध्यमातून आम्ही सामाजिक प्रश्न मांडत आलो आहोत. आता काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून प्रत्यक्ष समाजसेवा करण्याची संधी मिळत आहे.

**पक्षाशी एकनिष्ठ असणारे नेतृत्व खा रजनीताई पाटील आहेत. या नेतृत्वावर विश्वास ठेवूनच बहुजन समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष विशाल साबळे, दैनिक लोकनायक व्यवस्थापक ॲड अक्षय मुळे यांनी कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. काँग्रेस हा बहुजनवादी विचाराचा पक्ष आहे. खा रजनीताई पाटील यांचे हात बळकट करण्यासाठी आम्ही प्रवेश केला असल्याचे – ॲड मुळे यांनी सांगितले.**



*स्वतंत्र दिनानिमित्त हिमायत फाउंडेशन च्या वतीने उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे नारियल पाणी व राष्ट्रीय ध्वजचे वाटप करण्यात आले. यावेळी हिमायत फाउंडेशन चे अध्यक्ष मुफ्ती उमर कुरैशी उपाध्यक्ष सय्यद सोहेल सचिव शेख मुजीब शकील शेख मौलाना ताहेर मक्की फहाद चाऊस आदील कुरेशी लुकमान खान जिशान खान उपस्थित होते.*

# जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांना किमान वेतन व अनुषंगिक लाभ

## कंत्राटदाराच्या मनमानीला लगाम घालण्याचे बीड जिल्हा पालकमंत्री अजितदादा पवार यांनी दिले निर्देश

### रोजंदारी मजदुर सेनेने मानले दादांचे आभार ; घनकचरा व्यवस्थापन निधी प्रस्ताव पाठविल्याची संघटनेचे प्रत मागणीसाठी धरणे आंदोलन सुरुच

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद /नगरपंचायतीच्या अधिनस्त घनकचरा व्यवस्थापनातील कंत्राटी कामगार व औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ येथील सर्व विभाग प्रमुख यांच्या अधिनस्त कंत्राटदार यांच्याकडे कार्यरत वीज कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन व अनुषंगिक लाभ/प्रचलित विविध कामगार कायद्यांच्या सोयी सवलतीचा लाभ देऊन कंत्राटदाराच्या मनमानीला लगाम घालण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत अशा आशयाचे निवेदन राज्याचे अर्थ, नियोजन मंत्री व बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांना



रोजंदारी मजदूर सेनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी उप मुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी निर्देश दिले . जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड, मुख्य अभियंता, औष्णिक विद्युत केंद्र, परळी वैजनाथ, सरकारी कामगार अधिकारी, बीड यांना किमान वेतन व अनुषंगिक लाभ कंत्राटदाराच्या मनमानीला लगाम घालण्याचे निर्देश दिले.

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त बीडला राज्याचे अर्थ, नियोजन व बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम १५ ऑगस्ट रोजी संपन्न झाल्यानंतर संघटनेच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. एका बाजूला आपण मोठ्या थाटात स्वातंत्र्य दिन साजरा करत आहोत आणि दुसऱ्या बाजूला या जिल्ह्यातील कष्टकरी कंत्राटी कामगारांना त्यांच्या किमान वेतनासाठी व इतर मूलभूत हक्क मिळवून घेण्यासाठी सातत्याने संघर्ष करावा लागतो ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे.

कंत्राटदाराकडून केवळ वेतनाच्या सुमारे ३० ते ४० टक्के रक्कम दिली जाते. उर्वरित रक्कम कंत्राटदाराकडेच राहत असल्याने कंत्राटी कामगारांचे मागील अनेक वर्षापासून आर्थिक शोषण होत आहे. कंत्राटदार हे सत्ताधाऱ्यांच्या पक्षातील कार्यकर्ते असल्यामुळे त्यांच्यावर कोणीही कारवाई करत नाहीत. राजकीय वरदहस्त असल्यामुळे या कटात जिल्ह्यातील सर्व संबंधित अधिकारी सुद्धा समाविष्ट असल्यामुळे तेरी भी चूप मेरी भी चूप असा प्रकार वर्षानुवर्षे सुरू आहे.

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. १७ ऑगस्ट २०२५ ● पान ४

# पूरसंकटावर, नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

● नागरिकांनी घ्यावी काळजी : प्रशासनाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात पावसाळ्यातील पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाचा आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन विभाग तसेच बीड जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे . वेळोवेळी भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर , जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश दिले असून , नागरिकांनी सुरक्षिततेसाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी , असे आवाहन प्रशासनाने केले आहे. पूरप्रवण भागातील नागरिकांनी प्रशासनाशी पूर्ण सहकार्य करावे . नदी , नाले , धरण , तलाव या ठिकाणी जाणे टाळावे . सुरक्षित स्थळी हलण्यास प्रशासनाने सांगितल्यास त्वरित पाऊल उचला , असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले आहे. अधिकृत सूचनांचे पालन करा, अफवांवर विश्वास ठेवू नका. महत्त्वाची कागदपत्रे, औषधे, अन्नसाठा आणि पिण्याचे पाणी सुरक्षित ठेवा, असे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नमूद केले . तर अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे-सोनवणे यांनी इशारा देताना पूराच्या पाण्यातून पायी किंवा वाहनाने जाणे जीवघेणे ठरू शकते . मोबाईल चार्ज ठेवावा , सुरक्षित पाणीच वापरावे , असे सांगितले .

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनी आवाहन करताना पूरस्थिती किंवा आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांनी घाबरून न जाता तातडीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा . प्रशासन पूर्णपणे सज्ज असून त्वरित मदत पुरवली जाईल , असे प्रशांत वाघमारे यांनी सांगितले . त्यांचा संपर्क क्रमांक ९५ ६१ ४९ ९४ ४९ असून याशिवाय यासाठी

▶ उर्वरित पान २ वर





# मौजे वाघोरा येथील जलजीवन कामाची चौकशी करा : महादेव मोरे

## जिल्हा परिषद कार्यालयासमोर ग्रामस्थांचे आमरण उपोषण

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मौजे वाघोरा येथील जल जीवन मिशन अंतर्गत काम पूर्ण न करता बोगस बिल उचलल्या प्रकरणी बीड जिल्हा परिषद कार्यालया समोर वाघोरा येथील ग्रामस्थांनी आंदोलन केले. माजलगाव तालुक्यातील मोजे वाघोरा येथील जलजीवन मिशन योजनेअंतर्गत गुत्तेदार डावकर यांनी अधिकाऱ्यांशी संगणमत करून काम पूर्ण न करताच कोट्यावधी रुपयाचे बोगस बिल उचलले आहे. वाघोरा गावांतर्गत तसेच दलित वस्ती, दर्गा. व तांडा अंतर्गत कसल्याही प्रकारची पाईपलाईन न करता जुन्याच पाईपलाईनला कनेक्शन देत बिलांची मोजमाप पुस्तके दाखवत कोट्यावधीचे बोगस बिले उचलण्यात आली. सदरील काम हे मागील एक ते दीड वर्षापासून बंद पडलेली आहेत मात्र ७० टक्के बिल उचलण्यात आले आहे. त्यामुळे सदरील अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून गुत्तेदारस व सबंधीत एजन्सीला काळया यादीत टाकण्यात यावे या मागणीसाठी ग्रामस्थांनी दिनांक १५ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद कार्यालय बीड समोर आमरण उपोषण सुरू केले होते. त्या अनुषंगाने येत्या पंधरा दिवसात स्थळ पाहणी करून चौकशी करू असे लेखी आश्वासन दिल्यानंतरच ग्रामस्थांनी हे उपोषण

▶ उर्वरित पान २ वर




# स्वातंत्र्य दिनी मानवी साखळी तयार करून साकारला भारताचा नकाशा..!

## 'हम सब एक है' चा संदेश देत विद्यार्थ्यांनी केल्या महापुरूषांच्या वेशभूषा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

'हर घर तिरंगा' उपक्रमाचा एक भाग म्हणून तसेच 'हम सब एक है' चा संदेश देत विद्यार्थ्यांनी विविध महापुरूषांच्या वेशभूषा केल्या, या सोबतच स्वातंत्र्य दिनी १५० जणांची लक्षवेधी मानवी साखळी तयार करून भारताचा नकाशा साकारला. शहरातील आई सेंटर प्रो व बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यु व्हिजन पब्लिक स्कूलने विधायक उपक्रम राबवून भारताचा ७९ वा स्वतंत्रता दिवस साजरा केला.

▶ उर्वरित पान २ वर



# बाजीराव चव्हाण युवा मंच यांच्यावतीने १५ ऑगस्ट निमित्त बीडमध्ये शेकडो रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी संपन्न

## बीड मधील शेकडो गरजू रुग्णांनी, नेत्र तपासणी, दंत तपासणी, लहान मुलांची तपासणीचा घेतला लाभ

**बीड । प्रतिनिधी**

आरोग्य सेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद समोर ठेऊन. बीड जिल्ह्यामध्ये दरवर्षीप्रमाणे १५ ऑगस्ट दिनी महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, खासदार श्रीकांतजी शिंदे साहेब, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब, उपमुख्यमंत्री सहायता कक्ष प्रमुख श्री. मंगेशजी चिवटे साहेब, युवासेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शने शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड शहर, तसेच बाजीराव दादा चव्हाण युवा मंच. व धर्मवीर प्रतिष्ठान महा. राज्य. यांच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरामध्ये आज दि.१५ ऑगस्ट

▶ उर्वरित पान २ वर



# राजे शिवाजी गणेश मंडळाची कार्यकारणी जाहीर वर्ष २५ वे

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील नामांकित गणेश मंडळापैकी एक असलेला राजेशिवाजी गणेश मंडळ जिजामाता नगर माजलगाव या मंडळाला गेल्या काही वर्षात आमदार गणराया प्रथम क्रमांक ,पोलीस प्रशासनाकडून दिला जाणारा प्रथम पुरस्कार, रोटरी क्लब देण्यात येणारा प्रथम पुरस्कार, आतापर्यंत तीन वेळेस २०२१,२२,२०२३ वर्षाचे चे आमदार साहेब प्रथम पारितोषिक मिळवणारा एकमेव गणेश मंडळ तसेच मंडळाच्या वतीने विविध अशा सामाजिक कार्याने हा गणेशोत्सव साजरा केला जातो यामध्ये ,रक्तदान, आरोग्य शिबिर , वृक्षारोपण,गणेश विसर्जन दिवशी भव्य अशी टिपरी नृत्य , असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात आज दिनांक ६ ऑगस्ट रोजी मंडळाची कार्यकारणी जाहीर झाली त्यानुसार सल्लागार पदी सुरेश भाऊ शेटे, मदन नाना पांढरे, महादेव भैय्या शिरसट व अमोल भैया गिरी अध्यक्षपदी आसाराम चोरघडे उपाध्यक्ष सुरज एंखडे सचिव विकास पाटील, नितीन चोरघडे कोषाध्यक्ष अमोल ढवण, संतोष खेत्री, स्पर्धा प्रमुख पदी अजय चोरघडे ,गजानन जोशी ,लखन धरपडे, अभिषेक गायकवाड, रोहित लांडगे, विजय चोरघडे टिपरी नृत्य प्रमुख प्रवीण कुलकर्णी, गणेश तोडकरी, नियोजन समिती गोरख शिंदे, भानुदास सोळंके ,विलास कदम, रमेश सुरवसे, सचिन राऊत, महेश शेटे ,दिनेश गिरी ,बंटी राऊत, दशरथ चोरघडे, दीपक तोडकरी,मुकेश काळे सर, दुर्गादास देशमुख, संतोष शिंदे, राजेभाऊ काळे, राजेभाऊ शिंदे, लखन नायबळ ,महेश स्वामी,महादेव एखंडे, शिवानंद खुर्पे ,बालासाहेब नाटकर, ▶ उर्वरित पान २ वर



# स्वातंत्र्यरक्षणाबरोबरच पर्यावरण संवर्धन काळाची गरज : आदित्य पाटील

## माऊली विद्यापीठ संकुलात भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त पाचशे झाडे लावण्याच्या उपक्रमाची सुरूवात

**केज । प्रतिनिधी**

भारताच्या उज्वल आणि समृद्ध भविष्यासाठी स्वातंत्र्याचे रक्षण व पर्यावरणाचे संवर्धन करणे काळाची गरज व भविष्याची मागणी असण्याचे प्रतिपादन माऊली विद्यापीठ केजचे सचिव आदित्य पाटील यांनी केले. ते ७९ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त माऊली विद्यापीठ संकुलात सरस्वती महाविद्यालय, भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित झेंडावंदन कार्यक्रमात ते अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते. यावेळी सचिव आदित्य पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या सुरुवातीस राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी श्रीमती तेजस्विनी अशोक पाटील, सौ. देविका आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी श्री. प्रताप मोरे, प्राचार्य डॉ. गौतम पाटील, प्राचार्य विजयकुमार शिनगारे, प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर यांची प्रमुख उपस्थिती होती. पर्यावरण संरक्षण व हरितक्रांतीसाठी महत्वपूर्ण पाऊल उचलत यावेळी

▶ उर्वरित पान २ वर



## थोडक्यात...

### महाराष्ट्र विधानपरिषद सभापती राम शिंदे यांचा दौरा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषद सभापती राम शिंदे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. दिनांक १७ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता शासकीय विश्रामगृह अहिल्यानगर येथून शासकीय वाहनाने पिंप्री (घुमरी) ता. आष्टी, जि. बीड कडे प्रयाण. सकाळी ८.३० वा पिंप्री (घुमरी) ता. आष्टी, जि. बीड येथे आगमन व श्रीमती अश्विनी देवराव परकाळे यांची यु.पी.एस.सी. मध्ये खत्र्ऋ पदी निवड झाल्याबद्दल पिंप्री घुमरी ग्रामस्थांच्या वतीने आयोजित भव्य नागरी सत्कार सोहळ्यास उपस्थिती. सकाळी ९.३० वा. पिंप्री (घुमरी), ता.आष्टी, जि.बीड येथून शासकीय वाहनाने ता.कर्जत, जि.अहिल्यानगरकडे प्रयाण.

### मंगलम फुड अँड पार्क बीडकरांसाठी विरंगुळा स्पॉट: राजेंद्र मस्के



**बीड । प्रतिनिधी**

आज पालवण चहऱ्हाटा रोड, पालवण,येथे श्री विष्णू तात्या मस्के यांच्या मंगलम फुड ड पार्क नवीन उद्योगाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के,इंजि. अजय अर्जुनराव पाटील,इंजि. अक्षय शिवाजीराव घोडके,प्रा. नारायणराव मस्के, सीए जाधव,बळीराम गवते, रावसाहेब मस्के आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. बीड शहरात मुलं बाळ सहपरिवार निवांत खेळ मनोरंजना साठी उद्यानांची उणीव आहे. आधुनिक तंत्रज्ञान युगात मोबाईल मुळे माणसाच्या मुठीत जग आलं.परंतु माणसा माणसात दरी वाढली. मोठ्यांसह लहान मुले पूर्णतः मोबाईलच्या गर्तेतअडकले.सातत्याने मोबाईलच्या वापरा मुळे मुलांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागला. नवी पिढी खेळ गप्पा गोष्टी निसर्ग या पासून दूर चालली आहेत. आरोग्य आणि मानसिकते साठी हि बाब गंभीर ठरू शकते. लहान मुलांच्या बुद्धीवर शालेय अभ्यासक्रमांचा मोठा ताण आहे . कुटुंबाची जबाबदारी पेलताना महिला वर्गावर ही कायम तणावाची स्थिती असते. तणावग्रस्त मानसिकतेतून मुक्त होण्यासाठी निसर्गरम्य वातावरणात मुलांना बागडण्या साठी सर्व सोयी नियुक्त खुलं मैदान पाहिजे. ही सुविधा विष्णू मस्के यांनी बीड शहरा नजीक फुड अँड पार्क सुरू करून खऱ्या अर्थाने बीड करांची उणीव भरून काढली. मंगलम फूड अँड पार्क बीडकरांचा विरंगुळा स्पॉट ठरेल. अशा शुभेच्छा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिल्या.

### नितिन दादा नाईकनवरे संयमी नेतृत्वाचा वाढदिवस मुख्य रस्त्यावरच्या हायमासवर लाइटिंग बसून साजरा !



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील सामाजिक व राजकीय. क्षेत्रात एक संयमी,नेतृत्व अष्टपैलू व्यक्तिमत्व त्यांची ख्याती आहे माजी सभापती नितिन दादा नाईकनवरे यांचा वाढदिवस शहरात नगरपरीषद च्या हायमास लाईट पोलवर लाईटिंग करुन वाढदिवस साजरा करण्यात आला.माजलगाव शहरात आंबेडकर चौक ते संभाजी चौक येथे त्यांच्या वाढदिवसानिमित्त हायमास लाईट पोलवर लाईटिंग करण्यात आली रात्रीच्या वेळी उजेड पडत असल्याने शहरातिल ये,जा ,करणारे नागरिक समाधान व्यक्त करत आहे त्यांना शुभेच्छा देण्यासाठी माजलगाव परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली होती. दिनांक १४ ऑगस्ट२०२५ रोजी वाढदिवसनिमित्त हा वेगळा उपक्रम नितिन नाईकनवरे यांच्या वतीने आदर्श उपक्रम यशस्वी केला.माजलगाव येथील नितिन नाईकनवरे यांचा वाढदिवस हा तसा कैटूंबिक पातळीवरचा उत्साह वाढवणारा प्रसंग मात्र हाच उत्साह समाजातील वंचीत व गरीबांच्या वेदना कमी करण्यास कारणी पडतो तेव्हा तो उत्साह कैंटुबीक नाही तर सामाजिक सेवा ठरतो. असाच आदर्श वाढदिवस माजलगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समिती चे माजी सभापती नितिन दादा नाईकनवरे यांचा वाढदिवस माजलगाव शहरातिल मुख्य रस्त्याच्या हायमास लाईट पोलवर लाईटिंग करुन साजरा करण्यातआला त्यांना शुभेच्छा देण्यासाठी माजलगाव परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली होती.हा वेगळाआदर्श उपक्रम यशस्वी केला.या वेळी माजलगाव परीसरातिल सामाजिक व राजकीय पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक लि.केजची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न



**केज । प्रतिनिधी**

केज येथिल कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेने ग्राहकांच्या विश्वासहर्तेच्या जोरावर यशस्वी वाटचाल केली असून भविष्य काळात देखिल विश्वासाच्या पाठबळावरच बँक वाटचाल करणार आसल्याची माहिती बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांनी २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दिली.केजच्या कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा संस्थापक अध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली तर राजेशजी कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत रामकृष्णगड आंबळाचे बरड (सारूळ) येथे गुरुवारी दुपारी १ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाली.यावेळी बँकेने केलेल्या यशस्वी वाटचाली बद्दल ह.भ.प. त्रिविक्रमानंद शास्त्री (पिंपळनेरकर) यांनी समाधान व्यक्त केले.प्रसंगी जि.प.सदस्य संतोष (दादा) हांगे, ▶ उर्वरित पान २ वर